# निशाणी ६६ खालील आदेश
## ( धनाजी कदम वि. सुरेश कदम वगैरे )

१. प्रस्तुतचा अर्ज त्रयस्थ इसमातर्फे त्यास पक्षकार म्हणुन दाव्यात सामील करुन त्याचे म्हणणे सादर करणेकरिता परवानगी मिळणेसाठी दाखल करणेत आलेला आहे.

२. वादीने सदरचा दावा मौजे शेळकबाव, ता. कडेगांव येथील जमीन मिळकतीचे वाटप होवुन मिळणेसाठी केलेला असुन दावा मिळकतीपैकी गट नं.५२५ व ५२६ मधील वादी नं.२ चा अनुक्रमे ४ आणे व ३ आणेचा हिस्सा आणि प्रतिवादी नं.१, २ यांचा असलेला संपुर्ण हिस्सा ति-हाईत इसम नामे नंदकुमार भानुदा जाधव यांना दिनांक ०४.११.२००६ चे रजिस्टर खरेदीपत्राने दिलेले आहे आणि तशी नोंद फेरफार नं.३६५१ ने धरणेत आली, त्यामुळे सदर तारखेपासुन प्रस्तुत मिळकतीमध्ये ति-हाईत इसमाचीच कब्जेवहिवाट आहे. सबब ति-हाईत इसम हे या दावा मिळकतीचे बोनाफाईड परचेसर आहेत. नमुद मिळकत खरेदी दिलेबाबत वादी नं.१, २ व इतर प्रतिवादींना माहिती असुन देखील त्यांनी प्रस्तुतचा दावा ति-हाईत इसम यांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील न करता दाखल केलेला आहे. प्रस्तुत मिळकतीमध्ये ति-हाईत इसमाची कब्जेवहिवाट असलेने त्यांना याकामी ति-हाईत इसम म्हणुन हजर होणेची परवानगी मिळुन त्याअनुषंगे म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी आदेश होणेबाबत विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जाचे शेवटी म्हणणे देणेत येवुन त्यायोगे अर्जातील मजकुर अमान्य करुन ति-हाईत इसमाचे खरेदीखताबाबत वादीस कोणतीही कल्पना नसल्याचे कथन करुन ति-हाईत इसमास खरेदी

मिळकतीचे वाटप व कब्जा पाहिजे असल्यास त्याने वेगळा दावा दाखल करावा. कायदयाने त्रयस्थ इसमास प्रतिवादी म्हणुन हजर होता येणार नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणेबाबत विनंती केलेली आहे.

४. प्रस्तुत अर्जावर दोहोबाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीने याकामी आपले स्वत:चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले दाखल केले आहे. सबब सध्या दावा अशंत: चौकशीवर प्रलंबीत आहे. वादीने सदरचा दावा मौजे शेळकबाव, ता. कडेगांव येथील जमीन मिळकतीचे वाटप होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये दावा मिळकती संदर्भात ज्या लोकांचे हितसंबंध जोडलेले आहेत ते सर्व लोक या दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत. प्रस्तुत अर्जदारने या अर्जासोबत दिनांक ०४.११.२००६ रोजीचा रजिस्टर दस्त नं.१९२९/२००६ या खरेदीदस्ताची छायांकित प्रत हजर केलेली आहे. प्रस्तुत खरेदीपत्राचे अवलोकन केले असता अर्जदारने दावा मिळकतीमधील कांही क्षेत्राची वादी नं.२ व प्रतिवादी नं.१ व २ यांचेकडुन खरेदी केले असलेचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. वादी-प्रतिवादी याबाबत त्यांचे कथनामध्ये कोणताही उच्चार करत नाही. अशा परिस्थितीमध्ये त्रयस्थ इसम हे आवश्यक पक्षकार होत असलेने त्यास दावेत सामील करुन त्याचे म्हणणे दाखल करणेस परवानगी देणे गरजेचे व न्यायोचीत वाटत आहे. अशाप्रकारे त्रयस्थ इसमांस दावेचे कामी समाविष्ट केलेस वादी-प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही. सबब मी पुढील आदेश करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करणेत येत आहे.

**२.** त्रयस्थ इसम नंदकुमार भानुदास जाधव यांना प्रस्तुत दावेचे कामी आवश्यक पक्षकार म्हणुन प्रतिवादी नं.१६ असे समाविष्ट करणेत येत आहे.

**३.** वादीने सदर आदेशापासुन १४ दिवसाचे आत दावा दुरुस्ती करावी व त्या अनुषंगे त्वरीत दावा दुरुस्त प्रत तसेच प्रतिवादी नं.१६ करिता आवश्यक असणारी दावा प्रत, कागदपत्रके न्यायालयात त्वरीत दाखल करावेत.

**सही /-**

**दिनांक ०६.१०.२०१७.**

( श्रीमती. दुर्गा भ. सुतार )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कडेगांव.